भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ०४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०१/२०१७

१) अज्ञात मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी . :–

दिनांक ३१/१२/२०१६ चे २३.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादी हे किरण मनोहर मोहतुरे वय ३२ वर्ष, रा. मोहाडी हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु २६६८ मध्ये अग्रवाल पेट्रोल पंप येथुन आपल्या गाडीमध्ये पेट्रोल भरुन एनएच ०६ रोडनी त्रिमुर्ती चौक कडे जाण्यास निघाला असता समोरुन येणाऱ्या यातील अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल धडक देवुन जखमी केल्याने फिर्यादीचे बयान व डॉ रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

२) महेंद्रा मॅक्स गाडी पलटी होवुन स्वतः जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०१/०१/२०१७ चे ०१.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्यांचे साथीदार शैलेश मानी रामटेके वय ३६ वर्ष, रा. जगनाडे वार्ड तुमसर सोबत राज्य महामार्ग क्र. २७१ ने तुमसर येथे जात असता त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालविल्याने गाडीचे नियत्रंण सुटुन रोडाचे पुलीयाचे मुंडयाला धडक दिल्याने गाडी पलटी होवुन स्वतः व साथीदारास जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सतीश प्रकाश सानेकर वय ३० वर्ष, रा. नवीन हसारा टोली तुमसर यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका अन्वय गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

३) संगनमत करुन डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०१/०१/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील फिर्यादी वासुदेव मेहतर तांडेकर वय ५५ वर्ष, रा. कवलेवाडा याने स्वतचे अंगनात आंघोळ केली त्या आंघोळीचे पाणी आरोपीचे घराकडे गेला व चिखल झाला यावरुन आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी सोबत भांडण व शिविगाळ करुन फिर्यादीचे डोक्यावर आरोपी क्र. ०१ ने काठीने मारुन जखमी केले व आरोपी क्र. ०२ व ०३ यांनी पकडुन ठेवुन थापड बुक्यांनी मारपीट केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

४) दारूडया वाहन चालकावर कारवाई . :–

दिनांक ३१/१२/२०१६ चे २२.३० वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील डस्टर कार क्र. एमपी ०४ सीएल २१२९ चा चालक ही दारू पीवुन दारू चे नशेत चालवीतांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ ॲनालायझर मशीन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. उबाडे पो.स्टे. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) दारूडया वाहन चालकावर कारवाई . :–

दिनांक ०१/०१/२०१७ चे ०१.३० वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील ट्रक क्र. सीजी ०४ एलजे ५५१४ हा दारू पीवुन दारू चे नशेत व वाकडे तिकडे चालवीतांना मिळुन आल्याने त्याची सु. बो. दवाखाना तुमसर येथे वैदयकीय परीक्षण केले असता दारुचे अमला खाली असल्याचे अभीप्राय मिळाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गोंडाणे पो.स्टे. तुमसर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाणे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक ०१/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ५९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५३ केसेस करण्यात आलेल्या आहे

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.